# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १५४ /२०२३

या परिपत्रकाद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालये/परिसंस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२–२३ किंवा त्यापूर्वी ज्या अध्यापकांना त्याच महाविद्यालयात/परिसंस्थेत शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत, **फक्त अशा अध्यापकांचे** शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीताचे Continuation of Teachers Approval चे प्रस्ताव, संस्थेच्या ठरावासह नेमणूक आदेश, रूजू अहवाल, शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने दि. ११/०६/२०२३ ते दि. ३१/०७/२०२३ पर्यंत सादर करणेबाबत परिपत्रक क्र. १०२/२०२३ दि. ०६ जून, २०२३ अन्वये कळविण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीता महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने महाविद्यालयांना Continuation of Teachers Approval चे प्रस्ताव सादर करता आलेले नाहीत. तसेच यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०२२–२३ करीता विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या शिक्षक मान्यता प्रस्तावांतील त्रुटींची पुर्तता ही महाविद्यालयांकडून उशिराने प्राप्त झालेली असल्याने अशा शिक्षक मान्यता या विभागाकडून उशिराने देण्यात आलेल्या आहेत, तर काही महाविद्यालयांकडून अद्यापही त्रुटींची पूर्तता झालेली नाही. ही सर्व वस्तुस्थिती विचारात घेता महाविद्यालयांकडून Continuation of Teachers Approval चे प्रस्ताव सादर करण्याची मुदत दि. १८ ऑगस्ट, २०२३ पर्यंत वाढविण्यात येत आहे. या नंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणर नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी) 2/8/2023

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव,
शिक्षक मान्यता कक्ष

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
जावक क्र. – सीसीओ/2235
दिनांक - 02/08/2023

प्रति,
मा. संचालक /प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये / परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक.